# क्विक हील फाऊंडेशनतर्फे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' पुरस्कार सोहळा

**पुणे :** क्विक हील फाऊंडेशन या क्विक हील टेक्नॉलॉजीजच्या सीएसआर शाखेने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' पर्वाचे आयोजन केले. यात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' मध्ये सहभाग घेतलेल्या शैक्षणिक संस्था, शिक्षक, विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय प्रयत्नांना गौरविण्यात आले. क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, जळगाव येथील कवियत्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. महेश्वरी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवार, महाराष्ट्र सायबरचे पोलीस अधीक्षक संजय शिंत्रे आणि २९ सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ यावेळी उपस्थित होते.

'सायबर सुरक्षेसाठी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमाचा उद्देश सायबर सुरक्षिततेचे महत्त्व आणि डिजिटल विश्वामध्ये पालन करावयाच्या सर्वोत्तम पद्धतींबाबत जागरूकता निर्माण करण्यासह त्यांना शिक्षित करण्याचा आहे.

क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर म्हणाल्या, या उपक्रमांनी ५० लाखांहून अधिक व्यक्तींच्या, विशेषत: देशाच्या दुर्गम भागांमध्ये राहणाऱ्या व्यक्तींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे.

पोलीस अधीक्षक शिंत्रे म्हणाले, आज सायबरसुरक्षितता व सुरक्षेबाबत जागरूकतेच्या महत्त्वाकडे दुर्लक्ष करता येऊ शकत नाही.